FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154188

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. २८, वर्ष Year २०२२, दिनांक Date ०६/०६/२२

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम १९८८, कलमे Sections ७, ७(अ).
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from ०६/०६/२२ वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to ०६/०६/२२ वेळ Time ........

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०४/०६/२२, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १६/२२, तारीख Date ०६/०६/२२ वेळ Time २०:४५ वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहायक अभियंता जलकाम विभागाची चौकी पी/उत्तर विभाग, चिंचोली गार्डन, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली, मालाड (प) Ward मुंबई ६४ रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री. इमरानअली शेख.   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री रहेमतअली शेख.

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४२ वर्षे.   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9227282401

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

   (g) धर्म Religion ........, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........पॅन नं. PAN No. ........ गटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road बी-607, नेहरू क्र. ३/४ को.हौ.सोसायटी, मालवणी, मालाड, मालाड (प) मुंबई, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   लोकसेवक (१) सच्चिदानंद विश्वनाथप्पा मोरे (दुय्यम अभियंता) रा.ठि. जिवन हाईट्स को.ऑप. सोसायटी, फ्लॅट नं 602, चंदर पाखाडी रोड साकेत टॉवरच्या मागे न्यु लिंक रोड, कांदिवली खाजगी इसम (२) सलीम शेख अलमेलकर, वय वर्षे ६९, रा.ठि.

Y.P.P.–800 Reg.–(25×6–150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

"फिर्यादि : श्री ईमरान अली रेहमत अली शेख, व. ४२ यांचा जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखित केला असून तोच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल समजण्यात यावा.

समक्ष

(अजित [illegible])

पो. नि. ला. प्र. वि

फिर्याद दिनांक – ०८/०६/२०२२.

मी इमरानअली रहेमतअली शेख, वय ४२ वर्षे, धंदा – इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड, रा.ठी. बी–६०७, मेहल को.ओ.हौ.सौ. मालवणी म्हाडा, मालाड (प) मुंबई मो.क्र. ९२२७२८२४०१.

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटुंबासह राहावयास असुन माझा इंडियन ऑयल कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नातुन माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी राहत असलेल्या परिसरात म्हणजेच मालवणी म्हाडा येथे माझे मोकळा प्लॉट नं. ४३ वर मी माझ्या नवीन बंगल्याचे काम चालू केले होते. सदर काम चालू झाल्यावर मी महानगर पालिका पी/उत्तर–पश्चिम येथे नवीन पाणी कनेक्शनकरिता दि. ०६/०६/२०२२ रोजी अर्ज केला होता. परंतु दिनांक ०७/०६/२०२२ रोजी मी सकाळी मॉर्निंग वॉक करीत असताना माझे परिचयाचे व आमच्या विभागात राहणारे श्री. सलीम अलमेलकर हे मला भेटले व बोलले की, आपण पी/उत्तर–पश्चिम येथे पाणी कनेक्शनसाठी लिगल अर्ज केला आहे पण त्याकरिता लिगल अर्जासोबत तुम्ही रु. १,००,०००/– मला द्या, मी तुमचे काम करुन देतो. त्यामध्ये महानगर पालिकेचे कोरे साहेब, दुबे साहेब यांचे सह महानगर पालिकेच्या जलखाते विभागाचे सर्व स्टाफ हॅन्डल होईल, तसेच सलीम अलमेलकर यांनी मला सांगितले की, हे रु. १,००,०००/-- केवळ आपले पाणी कनेक्शन जास्त होणार म्हणून दयायचे आहेत.

मला लोकसेवक श्री कोरे व खाजगी इसम सलीम अलमेडकर यांना लाच दयावयाची इच्छा नसल्याने दि. ०७/०६/२०२२ रोजी १०:३० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. सदरवेळी तेथील वरिष्ठांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने कारवाईकरिता पो नि म्हात्रे यांची नेमणुक केली. पो नि म्हात्रे यांनी तक्रारीबाबत माझेकडे चौकशी करून तक्रारीच्या अनुषंगाने लेखी अर्ज करण्याबाबत सांगितले. त्या अनु ंगाने मी सदरचा तक्रार अर्ज माझे स्वत:चे हस्ताक्षरात हिंदी भा ेतून लिहिला असून मी त्यावर सही केली. मी केलेला अर्ज लाप्रवि कार्यालय येथे उपस्थित असलेल्या पंचांना पोनि म्हात्रे यांनी थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज वाचण्यास दिला. पोनि म्हात्रे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि म्हात्रे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

तदनंतर पोनि म्हात्रे यांनी मी केलेल्या अर्जाच्या अनु ंगाने आजच कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून सदर कारवाईकरिता सपोआ चौगुले, दोन शासकीय पंच तसेच पोलीस पथक नेमण्यात आले असून आलोसे यांनी पैशांची मागणी केल्याप्रमाणे रकमेची जमवाजमव करण्यास सांगितले. पोनि म्हात्रे यांनी सांगितले प्रमाणे मी माझ्या व पत्नीच्या बॅक एटीएम मधुन पैसे काढुन आवश्यक असलेली लाचेची रक्कम जमा केली व त्याबाबत पोनि म्हात्रे यांना माहिती दिली.

त्यानंतर पो.नि. म्हात्रे यांनी मला मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले व पडताळणीला जाताना माझे बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन माझेसोबत पंच क्रमांक १ म्हणुन अभिजित पाटील हे येणार असल्याचे असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक व खाजगी इसम यांना त्यांच्या कार्यालयात अथवा ते सांगतील तेथे जाऊन भेटण्याचे ठरले. पडताळणी कारवाईसाठी जाताना शासकीय वाहनाचा संशय येऊ नये म्हणुन खाजगी वाहने वापरत असल्याचे पो नि म्हात्रे यांनी सांगितले तसेच शासकीय वाहने देखील कोणासही संशय न येता आमचे सोबत राहणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोनि. म्हात्रे यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहीती समजावुन सांगितली व लोकसेवक श्री. कोरे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेण्याच्या सूचना दिल्या. सदर सूचना नुसार मी पडताळणी करीता माझे सोबत पंच क्र १ पाटील यांना घेऊन निघालो. सदरवेळी लोकसेवक श्री. कोरे हे पी/उत्तर विभाग जलकामे चौकी येथे बसले असल्याने मी सदर ठिकाणी जाऊन श्री कोरे यांची भेट घेतली व त्यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम कमी करण्याकरिता विनंती केली. सदरवेळी पडताळणी दरम्यान श्री. कोरे यांनी त्यांना रु.८०,०००/– व खाजगी इसम श्री. सलीम अलमेलकर यांना रु. २०,०००/– देण्याबाबत

Scanned with CamScanner

दि. ०८/०६/२०२२ रोजीचा श्री इमरानअली शेख यांचा फिर्यादी जबाव पुढे चालू .....

सांगितले. त्यावेळी मी त्यांना सदर रक्कम जमा करणेकरिता थोडा वेळ मागितला व तेथून पोनि म्हात्रे व पोलीस पथक थांबले असल्याचे ठिकाणी परत आलो.

मी परत आलेनंतर पोनि म्हात्रे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन त्याबाबतचे संभाषण ऐकले असता लोकसेवक यांनी माझे काम करुन देण्याकरिता यांना रु.८०,०००/– व खाजगी इसम श्री. सलीम अलमेलकर यांना रु. २०,०००/– लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पो.नि. म्हात्रे यांचे सुचनेनुसार माझेकडील आलोसे व खाजगी इसम यांना देण्याकरीता आणलेल्या लाचेच्या रक्कमेस पोलीस पथकातील अंमलदाराकडून अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. तद्नंतर सपोआ चौगुले, पोनि म्हात्रे, दोन शासकीय पंच व पोलीस पथक असे सर्व कोणासही संशय येऊ नये म्हणून रिक्षाने लोकसेवक श्री. कोरे बसलेल्या चौकीच्या दिशेने निघालो. चौकीजवळ आल्यानंतर मी शासकीय पंच श्री. पाटील यांचे समवेत श्री. कोरे यांचे चौकीत गेलो. तेथे जाऊन मी श्री. कोरे यांना पैसे घेऊन आलो असल्याबाबत सांगितले व त्यांनी मागणी केलेप्रमाणे रु. ८०,०००/– त्यांना दिले. सदर रक्कम श्री कोरे यांनी ते बसत असलेल्या टेबलच्या डाव्या खणामध्ये ठेवले. सदर लाचेची रक्कम स्विकारलेनंतर मी पोनि म्हात्रे यांना पूर्व नियोजित इशारा केला. तद्नंतर पोनि म्हात्रे व पोलीस पथकाने लोकसेवक श्री. कोरे यांचेकडून लाचेची रक्कम हस्तगत केली. त्याचवेळी पोलीस पथकाकडे असलेल्या अल्ट्रा व्हायलेट दिव्याखाली पाहीले असता लोकसेवक कोरे यांच्या डाव्या हातावर व टेबलाच्या खालील डाव्या बाजुस असलेल्या खणामध्ये मिळुन आलेल्या लाचेच्या रकमेवर अॅन्थ्रासीन पावडर असल्याचे दिसुन आले.

त्याचवेळी खाजगी इसम श्री. सलीम अलमेलकर यांनी मला माझे मोबाईलवर मिस कॉल दिला सदरवेळी मी पो.नि.म्हात्रे यांना कोणतीही सुचना न देता सलिम यांस संपर्क साधला असता सलिम यांनी मला पैसे तात्काळ घेऊन येणेबाबत सांगितले. सदर बाबत मी पोनि म्हात्रे यांना सांगितल्यानंतर त्यांनी तात्काळ पथकामधील तीन अंमलदार यांना लोकसेवक श्री. कोरे यांचे सोबत ठेवून उर्वरित पथकासह श्री. सलीम अलमेलकर यांच्या राहते निवासस्थानी मालवणी मालाड येथे निघालो. तेथे पोहचल्यानंतर माझे बनियनला डिव्हाईस लावून पंचासह सलीम यांना भेटण्यास पाठविले. त्यावेळी त्यांनी हाताने ईशारा करून मागणी केलेली लाचेची रक्कम मागीतल्याने मी माझेकडील रक्कम रु. २०,०००/– त्यांना दिली. श्री. सलीम यांनी रक्कम स्विकारल्यानंतर मी पोनि म्हात्रे यांचे सूचनेनुसार पुर्वनियोजित इशारा केला. पोनि म्हात्रे यांनी तात्काळ श्री. सलीम यांचेकडून असलेली रक्कम रु. २०,०००/– हस्तगत केली व त्यांना घेऊन लोकसवेक श्री. कोरे यांच्या पी नॉर्थ जलकामे येथील चौकीत आलो.

लोकसेवक कोरे यांनी माझ्या घराकरिता पाण्याचे कनेक्शन देण्याकरिता खाजगी इसमा मार्फतीने स्वतः करिता रु. ८०,०००/– व खाजगी इसमाकरिता रु. २०,०००/– अशी एकूण रु. १,००,०००/– इतकी लाचेची मागणी केली. तद्नंतर सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक कोरे यांनी स्वतःकरीता रु. ८०,०००/– व खाजगी इसमाने स्वतःकरिता रु. २०,०००/– अशी एकुण रू. १,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक श्री. कोरे व खाजगी इसम श्री. सलीम अलमेलकर यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री. कोरे व खाजगी इसम श्री. सलीम अलमेलकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( अमित सुधाकर म्हात्रे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

I.R.Shaikh

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ घेतल्यानंतर (handwritten, partly illegible)
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद ता.वेळ व ठिकाणी फि. यांचे मालवणी म्हाडा मध्ये प्लॉट नं.५३ या ठिकाणी फि. यांच्या [illegible] काम चालू करणार होते, त्या कामासाठी पाण्याच्या कनेक्शन मिळण्याकरिता पी/उत्तर मनपा कार्यालय, मालाड मुंबई येथे दि. ६।६।२०२२ रोजी लेखी अर्ज केला. परंतु दि. ७।६।२२ रोजी सकाळी मॉर्निंग वॉकच्या वेळी फि. यांच्या परिचयाचा ईसम नामे सलीम अवेमलकर हे भेटले व म्हणाले की, तुम्ही ज्या वॉटर कनेक्शन करिता अर्ज केला आहे ते काम आठवड्यात फि. यांस रु. १,००,०००/- मध्ये करून देईन. त्यात मनपा कार्यालयातील कोटे साहेब, [illegible] सर्व डिपार्टमेंट हॅन्डलिंग [illegible] असे सांगितले. पडताळणी दरम्यान आलोसे श्री कोटे यांनी स्वतःसाठी १०,०००/- लाच तसेच [illegible] सलीम अवेमलकर यांचेकरिता २०,०००/- रु.ची मागणी करून (स्विकारली) म्हणून गु.र.क्र. २०/२२, कलम ७,७(अ) भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन.........., जिल्हा.........., राज्य..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा J.R.Shewale
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अमित सुधाकर म्हात्रे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner